एकदा आम्ही शिर्डीस असताना नित्याप्रमाणें बाबांच्या पूजेस गेलो. सर्वांनीं पूजा केली, मोठी आरती झाली व नैवेद्य वगैरे दाखवून बाबांकडून उदी घेऊन सर्व मंडळी बिऱ्हाडीं परत जाणार. तेव्हा बाबा म्हणतात पहा मी आज कोणाला ओरडलो नाहींना ? असे उद्गार निघण्याचे कारण मी बाबांचे रागाला फार भीत असे. मला वाटे कीं. बाबा इतर मंडळीवर रागावणे ओरडणे करितात तसे मला नाहींना करणार ? व केव्हा केव्हा मशिदींत चढत असता जर बाबांचे उग्र स्वरूप दिसले तर श्री मायमाऊली माझ्यावर रागावतील कीं काय अशी मला भीति वाटे. म्हणून त्या दिवशीं त्यांनीं वरील उद्गार काढून माझे अंतर जाणले अशी माझी खात्री पटविली. व त्यावेळीं ते कोणावर रागावले नाहीं इतकेंच नव्हे तर त्या सार्‍या बैठकीभर सर्वांबरोबर फार प्रेमाने गोष्टी वगैरे सांगून आनंदांत होते.

तसेंच एकदां मी पूजा करित होते, व त्याचवेळीं आमचा मुलगा फार रडूं लागला तेव्हां बाबा म्हणाले तूं घरीं जा. तुझी पूजा तेथें आहे. बाबांनीं म्हटल्यावर उठलेंच पाहिजे. अर्ध्या पूजेतून घरीं आलें व पहातें तर मुलाने रडून आकांत केला आहे. तेव्हा वाटले कीं, बाबा किती अंतरज्ञानी आहेत पहा मुलाकरितां मला भर पूजेंतून घरीं जणूं काय वायरलेसप्रमाणें पाठविलें मुलाला समजावून परत गेलें तेव्हां बाबा म्हणतात आतां कर तुझी पूजा. एकूण बाबा स्वतःचे अंतरज्ञान प्रगट करण्यापेक्षां प्रत्येक व्यक्तीस आपआपल्या कर्तव्याची जाणीव सदोदीत देत असत.

आमच्या एका मुलास टायफाईड झाला. सर्व मंडळी भिऊन गेली. पण आमच्या वडील भगिनीनें बाबांस नवस केला कीं, डॉक्टरने ह्या मुलास बिछान्यांत टेकून बसण्याची परवानगी देताक्षणींच त्यास तुमचे पायावर घालण्यास घेऊन येईन.-१४ दिवसांनीं ताप निघाला. डॉक्टरला वाटलें हा फारच अशक्त झाला. ह्याला १०–१२ दिवसांशिवाय अगदीं हालवितांसुद्धां येणार नाहीं. परंतु आणखी ४।५ दिवसांतच डॉक्टरनें त्याला बसविण्याचा हुकूम दिला डॉक्तर निघून गेले व आम्हांस श्रीमायमाऊलीच्या नवसांची आठ-

वण झाली. दुसऱ्या दिवशीं डॉक्टरना विचारलें कीं,आम्हीं त्याला शिर्डीस नेऊं काय ? डॉक्टर म्हणाले काय ? ह्याला महिना झाल्याशिवाय हालवूं नका. परंतु इकडून सांगणे झाले कीं, त्याचे मावशीने बाबांस नवस केला आहे कीं ताप उतरल्याबरोबर दर्शनास आणीन. तर कसे काय ? डॉक्टरसाहेबांना ( म्हणजे सुप्रसिद्ध डॉ. नाडगीर ) आमची बाबांवर किती श्रद्धा आहे ती माहित होती तेव्हा ते म्हणाले कीं,तुम्हीं नेणारच. परंतु कांहीं झाले तर जोखम माझ्यावर नाहीं. कारण डॉक्टर जाणून होते कीं,त्यांनीं किती जरी सांगितलें तरी आम्हीं त्याचे ऐकणार नाहीं. म्हणून त्यानीं आगगाडींत वगैरे काहीं कमीजास्त झाल्यास औषधें वगैरे दिलीं. पुढें गाडींत बसणार तों त्यावेळीं मुलाची प्रकृति बिघडलेली वाटूं लागली. काय करणार ? डॉक्टरचें ऐकलें नाहीं आतां लोक मूर्ख म्हणतील. व हसतील. पण मनाने पक्के ठरविले ही श्रीमायमावलीबद्दल आपल्या श्रद्धेची परिक्षा करण्याचीच वेळ आहे. व म्हणून एक सारखे बाबांचे ध्यान करून प्रवास सुरू केला. केव्हां स्टेशन येतें व बाबांचे पायावर मुलांस घालतें असे झाले. नवस घेणाऱ्या बाईची तर अगदीं गाळण उडाली. कारण ट्रेनमध्ये ह्याची ही स्थिति तर टांग्याच्या हिसक्यांत हा काय करील ? स्टेशन येतांच एक मनुष्य येऊन विचारतो टांगा आणूं काय ? आण सांगितलें मात्र तो आवाज ऐकतांच मुलगा विचारतो बाबांचे घर आलें ? आतां मला बसवा. आंगांत पहातों तर ताप वगैरे कांहीं नाहीं व मुलाने उठून बसविण्याचा फार हट्ट घेतला. पण आम्हीं त्याला टांग्यांत मांडीवर निजलेलाच ठेविला. शिर्डीस पोहचतांच बाबाजवळ नेला. व लहान मुलाप्रमाणें बाबांनीं त्याला हातावर घेतला व चटकन उभा केला. व तोही उभा राहिला. आम्हांस वाटत होतें कीं, इतके दिवस तो पडून राहिलेला एकाएकीं उभा कसा राहील पण बाबांनीं उभाकरतांच तो नीट सशक्त मणसाप्रमाणें उभा राहिला व बाबांनीं एक आफोसचा आंबा व केळें त्याच्या हातांत दिलें. त्यानें पहिल्याने केळे खाल्ले व नंतर आंबा खाल्ला. आम्हांकडे पाहून बाबा म्हणतात, आतां नाहींना लोक हसणार. गाडींतली खूण दिली. असे अगणित दाखले व प्रचिती बाबांनीं आम्हांस दिल्या आहेत. व अजूनही देत आहेतच.

## वरील खेपेस रचलेलें गाणें

चाल. (बावुल नाथजी टेकडीवाले)

मालण गुंथीलाव । गुणीयल गजरो ॥
तारा गजरानु आपिश मजरो ॥
संत साई नाथने माटे । मालण ॥
येवो गुंथजे गजरो तूं आजे ॥
जेवो प्रभू साई नाथने साजे । मालण ॥
येमा गुंथजे गुलाबाना फुल ॥
जे तूं कहिस ते करसू कबूल ॥ मालण ॥
कांहीं बाकी न राखीस बाई ॥
तने आपिसू हिरानु मोल ॥ मालण ॥
वर सोळा सारा सण गार ॥
उपर हेमनी मोहर हजार ॥ मालण ॥

श्रीसद्‌गुरूसाईनाथ महाराजकी जय

## पहिल्या दर्शनानंतर रचलेलें

रजनी नाथ, गगनीं जसा, पूर्ण शोभतो ॥
धन्य जगीं साईनाथ, तेविं विलसतो ॥
अवतरला भूवरती, तारण्या जगा ॥
मुक्त करी झडकरी तूं, अज्ञ ह्या आम्हां ॥

## दुसऱ्या खेपेस रचलेलें.

( गाणें येथे उभी. )

हे रूप विमल हा कांती ॥
हें प्रेम अचल ही शांती । किती कथूं ॥.
तूं साईनाथ शिर्डीचा । होई तारक मम जन्माचा ॥ कि०
करी सार्थक मम जीविताचें ॥
पुत्र पौत्रादी सौभाग्य देई अक्षयीचें । किती कथूं ॥
तूं क्षमा दया ममता तूं । तूं मूर्तिमंत दत्ता तूं । किती क॰

## बाबांच्या देहांताचें स्वप्न.

सन १९१८ सालच्या विजयादशमीच्या दिवशीं (दसरा) रात्रीं सुमारें १२॥ चे वेळीं मला स्वप्न पडलें. आम्ही उभयतां बाबांचे मशिदींत जात आहोत. बाबा नेहमींप्रमाणे कठेड्यावर हात ठेऊन बसलेले आहेत. त्यांच्याजवळ दोन मनुष्यें बसलीं आहेत परंतु तीं आमच्या ओळखींतलीं नव्हतीं. आम्ही आत पाय ठेवतो तोंच बाबा वरवर मान करूं लागले. हात हालवणे वगैरे सर्व अंतकालचा प्रकार दृष्टीस पडला. हे पुढे होते. व मी मागें होते मी म्हणतें चला लवकर चाला बाबा आता देह ठेवतात. मला म्हणतात हं, संताला देह ठेवतात वगैरे बोलत नाहींत. त्यांच्या प्रकारास समाधि म्हणतात. बाबा अगदीं स्तब्ध होण्यापूर्वी आम्ही घाईनें वर चढलो, हे जाऊन अगदीं बाबांच्या जवळ बसणार व मी अगदीं वरचे पायरीवर होते तोंच श्री समर्थ साई माऊलींनीं देह ठेवला. उभयतांनीं बाबाजवळ पुष्कळ शोक केला कारण आमचा बोलता चालता देव गेला. काय करावे आता? तेव्हां हाच देव ह्यापुढें फार पावेल असे कोणीसें म्हटलें. कारण कांहीं एखादे नवीन कारण-काज करणें असलें म्हणजे श्रीसमर्थांस पत्रद्वारे कळविल्या खेरीज कांहीं करण्यास धीर होत नसे. फारच खेद वाटला व आकाश कोसळलें असेंच वाटूं लागलें. इतक्यांत थोडया वेळानें मी जागी झालें. व श्रीसमर्थांची प्रकृति ठीक नव्हती म्हणून जिवास फार हुरहुर लागली. किती वाजले म्हणून पहातें तों १२॥ वाजले असें दिसले. तशीच बसून राहिले. ४, ५, वाजले तरी झोंप येईना. सारखी मनाची तळमळ सुरू होती. शेवटीं मन धीर धरीना. उठलें. बाबांचे फोटोजवळ उदबत्ती लाविली. तेव्हां मला विचारणें झालें आज सारी रात्र तुझी गडबड काय आहे? मी स्वप्न सांगितले. व नंतर ६ च्या सुमारास घरांतील सर्व मंडळीस स्वप्न सांगितले. जो तो म्हणतो बाबा इतक्यांत समाधि घेणार नाहीं इतक्यांत सकाळीं पहिल्याच डिलीव्हरीस शिर्डीहून अण्णा चिंचणीकराचें कार्ड आलें कीं, कार्ड दसऱ्याच्या दिवशीं श्रीसमर्थांनीं दोनप्रहरीं तीन वाजतां देह ठेविला. श्रीमायमाउलीनीं तेथें देह ठेविल्याबरोबर त्याच रात्रीं येथें मला स्वप्नद्वारें बातमी दिली. त्याच वेळीं इन्फ्ल्युएंझाने आमची वडील भगिनी फार सिक होती म्हणून

कार्ड पाहातां क्षणीच शिर्डिस धांव घेतां आली नाहीं. नंतर दुसऱ्या रात्रीं त्याच वहिणीस बाबा स्वप्नात आले व म्हणतात कीं. कनदान तो तुझा पिवळा पितांबर आहे तो माझे आगारा तू घालण्यास दे. त्याच रात्रीं मला स्वप्न पडले ते असे. मी बाबाची पूजा करीत असतां बाबांनीं मला २ रु. काढून दिले. मी स्वप्नांतच आहे असा मला भास होऊन मी मनांत म्हणते कीं, स्वप्नात कोणी पैसे दिले तर ते लाभकारक नाहीत. तर बाबा म्हणतात घे घे भिऊं नकोस. व तुझ्या पेटींत जे पैसे साचलेले आहेत ते मला दे. त्याप्रमाणे पेटींतले सर्व पैसे भंडाऱ्यास दिले व पीतांबरही श्री मायमावल्लीच्या समाधीवर भंडाऱ्याच्या दिवशीं प्रथम घालून गेला.

**रा. सा. धोंडो विष्णू परुळकर एक श्री साईबाबांचे भक्त यांचे कुटुंबास सर्पदंश झाल्यावेळी श्री साईबाबांच्या उदीपासून आलेल्या गुणाबद्दल आलेल्या त्यांचे पत्राचा उताराः—**

" कळविण्यास आनंद वाटतो कीं, आमचे कुटुंबास कालरात्रीं म्हणजे ता. २२।४।२५ रोजीं बुधवारी रात्रीं ८ वाजतां सर्पदंश झाला. तें अस्सल विषारी फुरसे होते. त्याचे २ दांत चांगले आंत गेले होते. कांहीं वेळानें माझे कुटुंबाची दांतखिळी बसली. सर्व उपाय केले. परंतु आचके येऊं लागले. तेव्हां श्रीचे चरणाजवळ सौ. सत्यभामाबाईस ठेवून श्रीसाईबाबांचा धांवा केला व उत्तम उपाय म्हणून श्रीसाईबाबांची उदी पांच पांच मिनिटांनीं पाण्यांतून पिण्यास दिली. घरीं श्रीपुढें धूप जाळीत असतों त्याचा अंगारा लावला, तीन वेळां श्रीस शरण जाऊन श्रीची उदी दांत लागल्या ठिकाणीं लावली व नंतर श्रीचे उदीनें व कृपेनें ३ वाजतां आराम पडला व ठीक आहे. करितां आपण हें श्रीसाईलीलेत छापाल व श्रीचा आशिर्वाद व प्रसाद पाठवाल अशी आशा आहे

श्रीसाईनाथ

कांदिवली ता. १७-४-२५

रा. रा. आनंदराव परशराम डोळस यांस श्री साईबाबाचा आलेला अनुभव

मी यंदाच्या श्रीरामनवमीच्या उत्सवास श्रीशिर्डीस येण्याचा विचार केला होता व मी नेहमीप्रमाणें आमच्या हेडक्लार्कना विचारून एक महिन्याच्या रजेकरितां अर्ज केला व ज्या दिवशीं रजेचा अर्ज केला त्याच्या आठ दिवस अगोदरपासून माझा असिस्टंट आजारी होता त्यामुळे माझ्या रजेला बाध आला व माझ्या मनाला रात्रंदिवस श्रीशिर्डीस जाणें कसे होईल याची तळमळ लागली होती. तेव्हां मी श्रीबाबांचे स्तवन करून माझा रजेचा अर्ज हेड-क्लार्कच्या हातांत दिला व त्यानीं तो अर्ज ताबडतोब साहेबांकडे दाखल केला, व मी एक महिन्याची रजा मागतों असे कळवले तेव्हा साहेबांनीं त्याला प्रश्न केला कीं त्याचा असिस्टंट तर आजारी आहे व हा रजेवर गेल्यावर त्याचे काम कोण पहाणार ? करितां ह्याला सध्यां रजा देतां येणार नाहीं. हे शब्द ऐकून तर माझ्या मनाला फारच वाईट वाटलें व माझ्या मनात एक प्रकारचा त्वेष उत्पन्न झाला. मी मनांत श्रीबाबांना उद्गार काढिले कीं मी आपल्या दर्शनाकरिता येण्यास फारच उत्सुक झालों आहें व माझ्यापुढें तर ह्या अशा अडचणी उभ्या आहेत आणि जर आपण मला रजा देवविली नाहीं तर मी माझ्या नोकरीचा राजिनामा देईन पण आपल्या दर्शनास आल्या शिवाय रहाणार नाहीं.

नंतर दुसऱ्या दिवशीं रजा न मिळाल्यास माझा राजीनामा देण्याचा विचार मी आमच्या हेडक्लार्कला कळविणार होतों आणि घरांतून ऑफिसला निघताना मी हेच वरील उद्गार श्रीबाबांच्या फोटोजवळ काढिले.

ऑफिसांत गेल्यावर मी हेडक्लार्कला माझ्या रजेबद्दल विचारलें तेव्हां त्यांनीं ताबडतोब साहेबांकडे जाऊन मला दोन आठवड्यांची रजा

मिळावी अशी तजवीज केली व त्याप्रमाणे श्रीबाबांच्या कृपेनःन मला ती मिळाली.

तात्पर्यः—श्रीबाबांच्यावर पूर्ण श्रद्धा असल्यास कोणत्या ही कामांत अपयश येत नाहीं.

आपला नम्र

आनंदराव प. डोळस.

**रा. रा. गणेश पांडुरंग बेंद्रे यांचे श्रीसद्गुरूसाईबाबा यांच्या संबंधाचे अनुभव.**

## श्री सद्गुरू साईनाथ प्रसन्न

श्रीसमर्थ साईबाबांचे दर्शन घेण्याबद्दल अंधेरी येथील वैंडर श्री. रामचंद्र सीताराम देव यांहीं माझे मनांत प्रेरणा केल्यावरून इ. सन १९११ सालीं मी दर्शनास गेलों. त्यास आज चौदा वर्षें झालीं. समर्थ असताना मी त्यांचे दर्शनास वर्षांतून तीन वेळां जात असें. दर्शन झाल्यापासून त्यांहि मला अनेक तऱ्हेचे अनुभव दिलेले आहेत, व स्वप्नांतसुद्धां दर्शन देत जो जो प्रकार स्वप्नात होत असे तो तो मी ज्याला त्याला सांगत असें. एके दिवशीं मी समर्थांचे जवळ बसलों असतां त्यांहीं मला जवळ बोलावलें व म्हणाले कीं, " उगाच ज्याजवळ त्याजवळ बक बक् बकवा कां करीत असतोस ? अशी बक् बक् करूं नये." तेव्हां मी समजलों कीं स्वप्नांतील हकीकत मी पाहिजे त्याजवळ सांगतों त्यामुळेच बाबांहीं हे मला मुद्दाम सांगितलें. तेवेळेपासून मी माझे अनुभव कोणास सांगत नसें व मासिक पुस्तकांत देखील प्रसिद्ध केले नाहींत. परंतु शके १८४७ चे रामनवमीचे उत्सवांत शिरडीस गेल्यावेळीं मशिदींत दर्शन घेऊन मी व रा. रा. देव वगैरे मंडळी बसलों असतां तेथें श्री. रा. रा. अण्णासाहेब दाभोळकर दर्शनास आले. दर्शन घेतल्यावर ते मला व रा. रा. देव यांस म्हणाले कीं, " तुम्ही बाबांचे अनुभव देणार होतां ते अद्याप

तुमचेकडून आले नाहींत." बाबाहींच श्री. रा. रा. अण्णासाहेब ... मनात मला अनुभवाबद्दल विचारण्याची प्रेरणा केली अशी माझ्या मनाची समजूत झाल्यामुळे मी थोडेसे अनुभव देत आहे.

पहिले दर्शनाचे वेळीं मी समर्थांजवळ मागणें मागितलें कीं आपलें दर्शन नेहमीं मला घडत असावे. तेव्हा समर्थांनीं सांगितलें कीं, "जा, तुझ्या मनाप्रमाणे होईल." त्याप्रमाणें समर्थांची भक्तिरूप सेवा हा कालपर्यंत होत आहे.

माझ्या मनात बाबांचे पादुकांचे पूजन नेहमीं व्हावें असें आल्यावरून मी चांदीच्या पादुका करून श्री समर्थाकडे घेऊन गेलों. त्यांचे हातून पादुका मिळाव्या, मग पुजा करवी अशी माझी इच्छा होती. ती पादुका बाबांजवळ देण्यासाठीं मशिदींत श्री. रा. रा. काकासाहेब दीक्षित यांचे हातांत दिल्या बाबाहीं त्या आपल्या हातांत न घेता परभारे श्री. रा. रा. काकासाहेबांस त्या मजजवळ देण्यास सांगितलें, व मला जाण्यास सांगितलें. मी पादुका घेऊन श्री. रा. रा. काकासाहेब याचे वाड्यांत आलों. परंतु बाबांच्या हातून मला पादुका मिळाल्या नाहींत व त्या त्यांच्या हातूनच मिळाव्या अशी माझी अनावर इच्छा असल्यामुळे मी पुन्हा पादुका घेऊन दुपारीं मशिदींत गेलों. त्यावेळीं रा. रा. माधवराव देशपांडे तेथें होते. बाबांजवळ पादुका देण्यासाठीं मी त्या त्यांचेजवळ दिल्या. त्याहीं त्या समर्थांजवळ दिल्या त्यावेळीं समर्थांहीं मजला जवळ बोलाविले चिलीम ओढण्यास दिली व माझें हातात पादुका देऊन मला नारळ दिला तो मी पदरांत घेतला. बाबाहीं माझें अंतःकरण जाणून माझे हातांत पादुका व नारळ दिल्यावर माझे मनाचें शांतवन झालें.

गुंदीवली येथील गावठणांत जागेचा एक तुकडा होता. ती जागा घेऊन राहण्यास तेथें घर बांधावें अशी इच्छा माझे मनांत आल्यावरून शिरडी येथे अण्णा चिंचणीकर यांचे नांवावर समर्थास विचारण्याकरितां पत्र लिहिलें, जर बाबांहीं आज्ञा दिली तरच घर बांधावयाचें असा माझ्या

मनाचा निश्चय होता. अण्णा चिंचणीकरांनी बाबांस पत्र वाचून दाखविलें. बाबाहीं घर बांधावयास आज्ञा दिली. त्याप्रमाणे अण्णा चिंचणीकराचें पत्र आलें कीं " बाबांना पत्र वाचून दाखविलें व त्यांहीं सांगितलें कीं घर बांधावें. कांहीं हरकत नाहीं." असें अण्णा चिंचणीकरांनीं कळविल्यावरून मी जागा घेऊन घर बांधण्यास सुरवात केली. पाया पुरा झाल्यावर मी शिरडीस समर्थांकडे गेलों. मशिदींत मी व इतर पंधरा वीस मंडळी बसलेली होती. बाबांच्या अनेक तऱ्हेच्या गोष्टी चालल्या होत्या बाबांहीं गोष्टी सांगतां सांगतां, माझे घराचा प्लान जसा आहे तसा हातानें जमिनीवर दाखवून म्हणत होते कीं, " सभोंवती चारी बाजूनें घाण." तेव्हा मी आपले मनांत समजलों कीं बाबाहीं माझे घराचाच प्लान काढून दाखविला. त्याचे म्हणण्याप्रमाणे चारी बाजूनें घाण आहे मी बाबांचे चरणावर मस्तक ठेऊन विचारलें कीं, " बाबा, आपण आज्ञा दिल्या वरून घराचें काम सुरु केलें. पायास बराच खर्च झाला पुढे घराचे काम कसे होईल " तेव्हा बाबा म्हणाले " जा कांहीं चिंता करूं नको " समर्थांचे सांगण्याप्रमाणे घर कोणाची एक पै देखील कर्ज न काढतां तयार झालें. माझी स्थिति पुर्वी गरीबीची होती, त्यामुळे घराचे काम होईलच असें वाटत नव्हते परंतु बाबांच्या प्रसादामुळेच माझी स्थिति थोडी सुधारत चालली. मी बाबांना दक्षिणा देतेवेळीं ते म्हणाले, " एक दिलास तर एकाचे दहा होतील." तेव्हां त्यांच्या उक्तिमुळेंच माझ्या धंद्याला चांगलें यश येऊं लागलें.

एप्रील सन१९१८ इसवी महिन्यांत शिरडीस मी समर्थांचे दर्शनास गेलों. एके दिवशीं दुपारीं ३।४ वाजण्याचे सुमारास मी मशिदींत गेल्याबरोबर मला बाबांहीं सांगितलें कीं, ' येथें बसूं नको. अगोदर बुटीकडे जा आणि त्यांच्या जवळून दहा रुपये मागून घेऊन ये " त्याप्रमाणे मी श्री रा. रा. काकासाहेब दीक्षितांच्या वाड्यांत श्रीमंत रा. रा. बुटीसाहेब बसले होते त्यांस

नमस्कार करून सांगितलें कीं बाबांहीं आतां १० रुपये मागितले आहेत तेव्हां बुटीसाहेब मला म्हणाले की " बाबांना नमस्कार सांगा. आताच आमचा कारकून येथे वारला आहे त्याला नेण्याची तयारी चालली आहे, असे बाबांना सांगा " मी तसाच मशिदींत आलों मशिदींत येताच बाबांनीं मला पाहिल्याबरोबर विचारलें कीं " बुटीने काय सांगितले " तेव्हा श्री. रा. रा. बुटीसाहेब यांहीं सांगितलेली हकीकत बाबाना सांगितली. १०।१५ मंडळी बाबांजवळ बसली होती. त्यांत बाबांहीं मला सांगितले कीं "फार वाईट झाले जा. घाबरूं नये धीर धरावा हात पाय गाळूं नये " तेव्हां माझे मनांत आलें कीं १०।१५ मंडळी बसली असतां बाबांहीं मलाच एकट्याला असें कां बजावून सांगितले ? दुसरे दिवशीं बाबांहीं मला माझ्या घरीं जाण्यास सांगितलें. त्यावेळीं मी कांदिवली येथे राहात होतो. बाबांच्या आज्ञेप्रमाणे मी घरीं आलो. घरीं आल्यावर १।२ दिवसांनीं माझे वडील मुलास मुदतीचा ताप येऊन श्रीनें त्यास आपले चरणीं नेला. तेव्हां मला बाबांहीं केलेल्या उपदेशाची आठवण झाली. माझ्यावर हा प्रसंग येणार आहे, हें मला कळविण्याकरितांच बाबांहीं मला मुद्दाम श्री रा. रा. बुटीसाहेबांकडे पाठविलें.

सन १९२४ च्या डिसेंबर महिन्यात माझी मुलगी फारच सीक होती. ताप मुदतीचा होता. पंधरा वीस दिवस झोंप बिल्कूल लागली नाहीं डोळे ताठलेले होते. शरिरातील सर्व शिराना अतिशय ठणका लागलेला होता. डॉक्टरची व वैद्याचीं औषधे व २–४ इंजक्शने केलीं परंतु कांहीं केल्या झोंप येईना. शेवटीं त्याच स्थितींत तिच्या सासरकरानें तिला माझ्या कडे आणिली त्याच दिवशीं आम्ही तिला श्री समर्थ साईबाबांची उदी लावण्यास व पिण्यास दिली. उदी देतांच तिला थोडया वेळानें चांगली झोंप लागली पुढें तिची तब्येत चांगली सुधारली.

## श्रीसद्गुरु साईबाबा प्रसन्न.

### एका डॉक्टरांचा श्रीसाईबाबांबद्दल अनुभव

पुणे शुक्रवार पेठ २१-४-२५

सा. न. वि. वि. आपण खालील अनुभव आपल्या साईनाथलीला मासिकात प्रसिद्ध कराल अशी आशा धरून लिहीत आहे.

साईनाथबाबा ५।६ वर्षांपूर्वी समाधिस्थ झाले असतांना अजूनसुद्धां ते नास्तिकानाही कशा रीतीने आपल्या भजनीं लावतात त्याचा एक अनुभव माझ्या पाश्चिमात्य शिक्षणामुळे किंवा धर्मासंबंधी स्वाभाविक अनास्थेमुळे किंवा ढोंगी साधूंच्या कटु व मतलबी अनुभवामुळे माझा साधूंच्या थोतांडावर बिलकूल विश्वास नसे. आणि म्हणूनच मी त्यांची चेष्टा व थट्टा करीत असे. माझा जन्म अहमदनगर येथे झाला. माझ्या जन्मासंबंधाने अशी एक गोष्ट सागण्यांत येत असे कीं माझ्या मातोश्रीना अपत्यें होत नसत तेव्हां त्यांना कोणी एक महात्म्यांनीं मिरवलीच्या पहाडावरील अवलियाच्या दर्शनास जाण्यास सांगितले. आणि या सूचनेवरून त्यांनीं त्या साईमहाराजांचे दर्शनही घेतले व त्यांची मनापासून सेवा करण्यास सुरवात केली. कांहीं कालानें त्यांच्या पोटीं मी जन्मास आलो व माझ्यानंतर दुसरींही पुष्कळ भावंडे झालीं. आणि त्यापैकीं हल्लीं काहीं अधिकारावर आहेत. माझी नौकरी पुण्यास असल्याकारणाने मला अहमदनगरास जाण्याचा योग क्वचितच येत असे. ज्या ज्या वेळीं मी तेथे जात असें त्या त्या वेळीं त्या पहाडावरील साईमहाराजांच्या दर्शनास जाण्याचा मला अतिशय आग्रह करण्यांत येत असे. पण मी असल्या भोळसर व फाजील भाविक लोकांच्या माथेफिरूपणाच्या आग्रहाला विनोद या पलिकडे काहींही महत्त्व दिले नाहीं. गेल्या खेपेला मी नगरास गेलो असतांना तोच ससेमिरा माझ्यामागे लावण्यांत आला. पण त्यावेळींसुद्धां या खुळ्या समजुतीला मी कांहींच महत्त्व दिले नाहीं परंतु माझ्या कुटुंबाच्या मनावर त्याचा परिणाम विचित्र तऱ्हेने झाला. आणि म्हणूनच पुत्रसंततीच्या लोभाला त्यांनीं मोहून दर्शनाचा योग साधला. त्यावेळीं त्याना गुरुवार करण्यास सांगण्यात आले. व सूर्यास्त झाल्यावर बाहेर अंगणांत शुद्ध हवेंत

त्या अवलियाचे नावाने धूप जाळून त्यांचे स्मरण करावें व नंतर उदास सोडावा असा विधि सांगण्यांत आला.

काहीं काल गेल्यावर पुढे माझ्या दुर्दैवाने (म्हणण्यापेक्षा सुदैवानेंच म्हणणे हल्लीं मला विशेष श्रेयस्कर आहे.)मी आजारी पडलो साधारण माझ्या आजाराला आरंभ तारीख १५ आक्टोबर सन १९२४ इसवीला झाला व पुढें हल्लींच्या पद्धतीला अनुसरून योग्य असे पुष्कळ उपाय केले असूनही मला बरें न वाटता उलट आजार वाढतच गेला. इंजेक्शनें वगैरे पुष्कळ उपाय केले पण कांहीं फरक न पडतां उलट आजार विकोपाला जाऊं लागला. दुधाशिवाय मला कांहींच घेतां येत नसे आणि कदाचित घेतल्यास अन्नदोषामुळे वांती होत असे. दरम्यान शिरडीच्या साईनाथ महाराजांच्या एका अत्यंत भाविक व माझ्या नुसते परिचयाचेच नव्हे पण माझ्या कल्याणाची उत्कट इच्छा बाळगणाऱ्या परमपूज्य अशा एका गृहस्थानीं ( काशिनाथ शंकर दुबे) साईनाथ महाराजांची पूजा केल्यास सर्व त्रास नाहींसा होईल व मना-सारख्या गोष्टी होतील असे मला फार आग्रहानें सांगितलें. पण माझ्या पूर्वप-दाला अनुसरून माझ्यावर त्याचा कांहींच परिणाम झाला नाहीं. मनुष्य संकटांत असतां वाऱ्यालासुद्धा तोंड पसरीत असतो. आणि ज्याच्यावर आपलें सर्वस्व म्हणण्यापेक्षां सर्व जीवन अवलंबन असतें अशा आर्यसंस्कृतीच्या पवित्र धर्मास अनुरूप माझ्या कुटुंबाने मीही गुरुवार करावेत अशी मला विनंती केली. येवी तेवी मला दुधाशिवाय कांहींच घेववत नसे म्हणून सहजासहजीं मला त्या विनंतीप्रमाणे वागतां येत आहे. असें वाटल्यावरून मी त्याला संमती दिली. दुधाशिवाय मला कांहीं खातां आलें असतें तर मी असल्या दुध-खुळ्या विनंतीला कधींच रुकार दिला नसता. एका गुरुवारीं माझ्या येथें मुंबईहून एक प्रतिष्ठित गृहस्थ आले व त्यांच्या सुधारक मताला मी गुरुवार करतों ही कल्पना कशीशीच वाटली. व बोलतां बोलतां ते असेंही बोलले कीं आमच्या धर्मांत देवांचा दुष्काळ पडला म्हणूनच कीं काय आपण मुसलमानी धर्मांतील अवलियाच्या भक्तीला लागलां आहांत. माझ्या संशय दोलायमान मनाला त्यांचे म्हणणें पटल्यासारखें वाटलें. संध्याकाळच्या गाडीनें पाहुणे निघून गेले, तरीपण माझ्या मनांतील खळबळ कांहीं केल्या शांत होईना.

नंतर रात्री १२ च्या सुमारास मला एक स्वप्न पडले व -दान दोन्ही धर्मांची मिश्रण असलेली अशी एक विभूति दिसली. तिच्या कपाळाला गंध होते अंगावरील सर्व कपडे पांढरे शुभ्र होते. डोक्याला एक पांढरें फडके बांधलेले होते. त्यानीं मला खालील आशयाचा उपदेश केला. "साईनाथ महाराज और दत्तात्रय दोनो एकही हैं. बहिरंगसे कभी भी तुलना नही अंतरमे जो एकतत्त्व है उसकूहि देखना और पैछानना."

हा उपदेश एकसारखा माझ्या कानांत घुमत होता. सकाळीं उठल्यानंतर मी या बाबतींत त्या पूज्य व्यक्तीचा (काशीनाथपंताचा) सल्ला घेतला व त्यांनीं मला पूजा करण्यासंबंधीं आग्रह केला. त्याचे दुसरे दिवशीं बाबांची पूजा केली पूजेपर्यंत मला दुधाशिवाय कांहींही खाता येत नसे. प्रसाद काहींही व कसलाही असला तरी मुकाट्यानें खावा असें ऐकल्यावरून पूजेनंतर मला अपथ्य होण्यासारखा प्रसादांत पदार्थ असतांनासुद्धां मी त्याचा स्वाहा केला. आश्चर्याची गोष्ट ही कीं, मला त्यापासून कांहींही अपाय न होतां उलट बरें वाटलें. व दुसऱ्या दिवसापासून औषधही बंद केले. इतकेंच नव्हे तर थोडेथोडे अन्नही घेण्यास सुरवात केली. औषधावांचून मला बरें वाटणार नाहीं असा डॉक्टरांचा अभिप्राय असतांनाही माझ्या साईनाथ महाराजांच्या ठिकाणीं जडलेला एकनिष्ठ भावनेनें मला उत्कृष्ट गुण आला, व त्यांच्याच मेहरनजरेनें हल्लीं मी उत्तम आरोग्य भोगीत आहें.

"जया मनीं जैसा भाव तया तैसा अनुभव" दुसऱ्या एका प्रसंगी माझ्या हाताखालील कांहीं लोकांना माझा चोख स्वभाव व थोडीशी कडक शिस्त न आवडून त्या स्वार्थी मंडळीनीं गुप्त कट करून माझ्या वरिष्ठ अधिकाऱ्याचें मन कलुषित करण्याची शिकस्त केली. त्यांत माझ्यावरही मोठेंच किटाळ आलें होतें व प्रसंगविशेषीं मला नोकरी करण्यांत पुष्कळच त्रास झाला असता पण मुख्य अधिकाऱ्यांच्या तपासणीच्यावेळीं मला त्यांच्या ठिकाणीं प्रत्यक्ष महाराजच दिसले व तपासणींत माझें कसलेंही नुकसान न होतां उलट त्या लोकांची नाचक्की झाली. हा सर्व प्रताप माझ्या साईनाथ महाराजांच्या ठिकाणीं जडलेल्या अढळ निष्ठेचाच होय असें मला वाटलें.

आणखी एका प्रसंगीं मी डिस्ट्रिक्टमध्ये फिरत असतांना एका ठिकाणीं कांहीं अडचणीमुळे मला माझ्या नौकरासह मुक्काम करणें भाग पडले. दुसरे दिवशीं उठून बऱ्याच अंतरावर असलेल्या एका ठरलेल्या गांवीं मला जावयाचे होते. परंतु आधले दिवशीं रात्रीं निजतांना असें कळलें कीं शजारच्या एका गांवीं मोठी यात्रा आहे तेव्हा गाडी मिळणे शक्य नाहीं. परंतु रात्री निजतांना मी माझ्या मनाशीं असा संकल्प करून निजलों कीं, माझा भाव जर साईनाथ महाराजांच्या ठिकाणीं दृढ असेल तर माझ्या मार्गांत अथवा कार्यांत कसलींही विघ्नें उपस्थित न होतां सकाळीं मी ठरलेल्या वेळीं व ठरल्या ठिकाणीं नित्रास जाईन. खरोखरच तसा चमत्कार झाला. सकाळीं तसा एक गाडीवाला अचूक आमच्या उतरलेल्या घरासमोर आला व त्यांनीं होऊन आम्हांस उठविलें व ठरलेल्या ठिकाणीं सुरक्षित नेलें.

आणखी एका प्रसंगीं घरामध्ये माझ्या मुलीला खोकला अतिशय झाला पुष्कळ उपाय केले परंतु काहींच उपयोग झाला नाहीं. नंतर शेवटची हेमगर्भाची मात्रा म्हणून साईनाथ महाराजाची उदी औषध म्हणून तीन दिवस देण्यांत आली आणि आश्चर्य हें कीं मुलगी साफ बरी झाली.

अवतारी विभूतींच्या लीला वर्णन करणें किंवा गुणानुवाद गाणें माझ्यासारख्या क्षुद्र मनुष्याच्या शक्तीबाहेरचें आहे. त्यांची कृपा झाल्यास ते काय करूं शकणार नाहींत.

" मूकं करोति वाचालं पंगुं लंघयते गिरिम् ।
यत्कृपा तमहं वन्दे परमानंद माधवम् ।

म्हणून एकेवेळीं असा पुरा नास्तिक असणारा जो मी जो कल्पग्याही प्रसंगीं कोणाही विभूतीला महत्त्व देत नसे, इतकेंच नव्हे तर शक्य तितक्या रीतीनें जो उलट त्यांचा उपहास करीत असे तो मी आतां श्रीसाईबाबांच्या कृपाप्रसादानें पूर्ण भाविक बनलों आहें. तेव्हां कोणीही गृहस्थानें आपल्या विद्वत्तेच्या घमेंडींत निदान अनुभवाशिवाय कोणाचा उपहास तरी करूं नये. अशी सर्वांच्या चरणीं लीन असणाऱ्या या दासाची अत्यंत नम्र व कळकळीची प्रार्थना आहे.

बाबांचा एक दासानुदास.

25-2-12

SaiBaba told a story about his brother having misbehaved once and being outcasted in consequence Sayin Baba. looked after him and eventually had him re-admitted to the caste

27-2-12.

When I went to the Musjid about 11 a.m. Sayin Baba said that he walked through a field in which there were very big parrots The parrots were scared away by his presence and he stood long admiring their sizes and colour.

28-2-12.

I attended the Kakad Arti and was on my return praying when Dhondobaba arrived from Poona He returned recently from Burma and I sat talking with him about the health of my friend Tilak and the state of his mind. It is as good as it can be under the circumstances, He wishes me to return to my practice at the bar but that depends upon what Sayin Sahib orders We held our Panchadashi class and Mr. Balasahib Bhate attended it. We saw Sayin Sahib go out and later on I went to the Musjid after he returned. He asked me if Jivamuni would pay. I could not make out what Jivamuni meant, but replied that Jivamuni would if ordered. He said Jivamuni would not. He gave me a lot of fruits and sweets.

29-2-12.

I prayed in the morning and held our Panchadashi class. While we were at it Sayin Baba passed through and we saw him near Sathe's wada. He appeared very much tired. I saw him again after he returned and he appeared to be in a very pleased mood. He said that Balasahib Bhate was a "Khatri, that his wife was a "Salin" i.e., weaver, and that his son Babu was also a Sali. Sayin Sahib said further that Wasudeo Kaka was a Rajput in his former birth and bore the name of

Jaising that he was fond of meat and that Sayin Sahib and others used to make him very angry by asking him if he wanted the head of a goat; that this Jaising had three sons who served in the army and a daughter who turned out bad became the *keep of a Barwar*, bore three children by him and died there. The midday Arti passed off as usual except that Waman Tatya who came after it and wished to worship got a good harvest of hard words. After the midday meal I lay down for a while and then we continued our Panchadashi class till evening when we went to see Sayin Sahib at his stroll. After the wada Arti I went with Musjid to attend the procession to Chavadi and the Shej Arti there. Sayin Sahib exhibited an angry mood, abused those that had got on to the roof of the Musjid for lighting lamps and at the time when the procession started he threw his stick at Mrs. Tai Jog the wife of Bapusahib At the Chawadi I thought he would beat Bapusahib Jog for he approached the latter, held his hands and demanded why Arti was done, but after a while he beat Bala Simpi with his stick and later on Trimbakrao whom he calls Maruti Bala Simpi ran away but Trimbakrao received the blow standing and prostrating before Sayin Maharaj. I think he received a full measure of favour and got ahead by at least a stage. Sayin Sahib was talking loudly when we returned. I sat talking with Balasahib Bhate. Bhishma read Bhagvat and Dasa Bodha

1-3-12.

I went to Musjid about 11 a m. and Sayin Baba seemed to be in a very good mood, but looked very much tired. Trimbak Rao came very much near to abusing Fakir Baba for what appeared to me to be a very trifling matter. The mid-day Arti passed off as usual. Sayin Baba remembered Mr. Dixit, Nanasahib Chandorkar and Sathe,

3-3-12

I attended the Kakad Arti and Sayin Baba looked pleased and passed into the Musjid without any hard words Abdulla in trying to remove a hanging lamp by accident left it so as to drop to the ground and get shattered. I thought this might anger Sayin Baba but it did not. He took no notice of it. We held our Panchadashi class and sat in my room as it was very windy in the verandah. We saw Sayin Baba go out and again after he returned. He said that in a former birth I was with him for two or three years and went into royal service though there was enough at home to live in comfort. wished to learn further particulars but Sayin Sahib would not communicate them.

4-3-12.

My wife was late in going to worship Sai Sahib but he very kindly desisted from his meal and let her worship him.

6-3-12.

We finished the Kutastha Deep and began the Dnyana Deepa. After the class I went to the Musjid as usual and Sayin Baba happened to be in a very good mood, so I sat serving him. He said he felt as if tied at the waist, chest and near the neck, that he thought Nagavely leaves were put on his eyes and on opening them to find out what the matter was, he was surprised to see some thing which he could not understand. He caught a leg of it and then it lay down. He tried to light his fire but the fuel being not quite dry would not ignite. He thought he saw four dead bodies removed and could not understand whose they were. Sayin Sahib kept on speaking in the same strain saying that his left upper and lower jaws were very painful and that he could not even drink water.

7-3-12.

I attended the Kakad Arti. Sayin Maharaj was in a very pleased mood and danced as he left the Chawadi and went towards the Musjid.

8-3-12.

In the morning Bhishma and Bandu got up early and had a musical prayer It was very helpful, I prayed and then we had our Panchadashi class. We saw Sayin Maharaj go out and later on I went to the Musjid. Sayin Maharaj very kindly called me by name and as soon as I sat down he commenced a tale of his having had four brothers He said he was very young but very intelligent. He used to play at his house which was very big and also at the Ashub Khana which was close by. Near it used to sit a very old man who would not go either into the Musjid or the Ashub Khana saying that the place where he lay was his. His people did not wish it but Sayin Baba used to go to the Ashubkhana also and approved of the programme carried out there. The old man turned out to be his mother's father and Sayin Baba always carried to him a bread and something to eat it with. The old man was a *leper* but his fingers and toes daily grew worse until at last he refused food and died Sayin Baba played near him, did not suspect that death was so near and talked about it to his mother who went to see her father. When Sayin Baba went he found the old man gone and his body converted into rice. Nobody would take charge of the clothes of the old man. Later on the rice disappeared and the old man was born again but associated with mangs. Sayin Baba gave him food and then the old man was born a third time as a son of Kondaji. The boy played with Sayin Baba and died a few months ago. At the midday Arti Sayin Baba approached me

and touched my left arm and held his hand waist high just as we do to indicate a young man, with the other hand he made a sign as we do to indicate a man passing away. He made a sign with his eyes. I did not understand the whole and puzzled over it all day.

9-3-12.

In the morning I attended the Kakad Arti. Sayin Sahib appeared to be in a very good mood. He blessed as usual by saying that God was higher than all Then he passed away into the Musjid, I returned, prayed, and was making ready for the Punchadashi class when Dhanjisha arrived from Bombay. He brought very good fruit for Sayin Sahib. We sat talking saw Sayin Sahib as he went out, we held our class but did not make much progress, I went to Musjid as usual. Sayin Sahib told the history of two sparrows that were sitting in the nicha in the southern side of the "Nimbar" He said the sparrows built their nest there and used to sit as they were sitting at the moment. Death overtook them It came in the form of a serpent, which crawled round the Nimbar and swallowed them up The sparrows are born again now and have built their nest again exactly where it was before and are sitting once more as they used to do. He said he never touched them not even spoke to them. He accepted Dhanjisha's Puja and allowed the garland to remain on him much longer than he ever does. He liked the flowers and ate a few grapes. Dhanjisha is of course staying with me. After meals I lay down for a while and then we held our class or rather coutinued it. We enjoyed the portion very much. At sunset we went and saw Sayin Maharaj at his stroll. He was in a pleased mood but said that he did not care for buntings etc., etc., but he wanted men. At night Bhishma read Swanubhawa Dinkar and Dasa Bodha. Balasahib Bhate also came. There was also Bhajan.

10-3-12.

We saw Sayin Baba go out and I went to the Musjid on his return. He addressed me by name and said that his father was very rich, had money buried in all imaginable places. Once he

had a little difference with his father when he was very young and went away to a place. It was a broad and thick cactus hedge and he found a large treasure underground there. Sayin Sahib sat in it and became converted into a big cobra. He sat on for some time and then felt inclined to go away So he moved away to a neighbouring village and on the way regained his human form. Then he went to a lane where they killed men. He wandered there but was left unhurt. Then he went about begging and brought all the treasnre trove in. The midday Arti passed off as usual and when I was returning he said "Look here; be careful, some guests will come; do not admit them" all which meant that I shall have some disturing influeuces and I shall with stand them. After the midday meal I lay down fot a while and then got a letter from Anna Sahib Mutalik saying that Uma has become a lady. There is the religious and the social ceremony to be performed which means expence. Narayan Dhamankar writes me from Amraoti to sây that they are all very hard pressed for money on all sides, so I understand the necessity of the warning given by Sayin sahib,



श्रीसाईबाबा गांवांत भिक्षेकरितां रोज सकाळीं निघत असत त्यावेळचा त्यांचा फोटो.

## रामनवमीचा उत्सव.

दरवर्षाप्रमाणे येंदाचा शिरडी येथील रामजयंतीचा उत्सव मोठ्या थाटानें झाला उत्सवाकरिता निरनिराळ्या ठिकाणची मंडळी शिरडीस आली होती. महाराजांनीं देह ठेवल्यानंतर शिरडी संस्थानची व तदंगभूत उत्सवाची जी व्यवस्था करण्यांत आली त्यांत हा उत्सव ह. भ. प. दास गणुमहाराज व रा. तात्या गणपत कोते पाटील या महाराजांच्या भक्तद्वयाकडे सोपविण्यात आला. त्या प्रमाणे या दोघांनीं आजपर्यंत हा उत्सव मोठ्या उत्साहाने चलविला आहे. या उत्सवाला दोन अंगे आहेत. एक रामजयंतीचा उत्सव व दुसरा ' उरुस ' व त्याप्रीत्यर्थ होणारे कुस्त्यांचे आखाडे वगैरे. हे दोन प्रकारचे उत्सव कसे सुरू झाले ती हकीकत प्रसंगानुसार थोडी बहुत श्रीसाईलीलेत आलेली आहे. परंतु सोईकरिता तीच सुसंगत रीतीनें आम्ही पुढे मांडीत आहोत.

या उत्सवाची मूळ सुरवात म्हणजे 'उरुस' उर्फ जत्रा. या उरुसाची कल्पना सन १८९७ साली गोपाळराव गुंड नांवाचे महाराजांचे एक भक्त होते त्यांच मनांत प्रथम आली. गोपाळराव गुंड हे कोपरगांवचे मुल्की सर्कल-इन्स्पेक्टर होते. यांना तीन कुटुंबे असून मुलगा नव्हता. महाराजांचे चरणावर यांचे मन जडलें व महाराजांचे आशिर्वादाने त्यांना मुलगा झाला. त्या आनंदांत ही त्यांना उरुसाची कल्पना सुचली. ही कल्पना त्यांनीं तात्या पाटील, दादा कोते पाटील, माधवराय देशपांडे वगैरे प्रमुख गांवकरी पुढे मांडली. सर्वांना ती पसंत पडून मंडळींनीं जमवाजमव करण्याच मनावर घेतले. परंतु त्यां वेळीं तेथें असलेल्या शिरडीच्या कुळकर्ण्यानें तिला विरोध केला. उरुस भरविल्यास रोगराई होण्याचा संभव आहे अशा तऱ्हेनें त्यानें कलेक्टरकडे 'रिपोर्ट' केला व त्यावरून कलेक्टर साहेबांनीं परवानगी देण्याचें नाकारिले. मंडळी नाउमेद झाली परंतु उरुस भरविण्यासंबंधीं महाराजांचा पूर्ण आशिर्वाद होता. तेव्हां मंडळीनीं परवानगी मिळविण्याची फिरून खटपट चालविल

व शेवटीं पहिला हुकुम रद्द करवून मंडळींनीं कलेक्टरकडून हुकुम तर मिळविला व उरुसाकरितां महाराजाचे आज्ञेने रामनवमीचा दिवस नक्की केला. वर्षांतील सर्व दिवस सोडून रामनवमीच मुक्रर करण्यात महाराजांचा अंतस्थ हेतू होता हें पुढे कळून आले. याच उरुसाला पुढे कालांतराने रामजयंती च्या उत्सवाचें स्वरूप देऊन दोन्हीं उत्सव एकाच दिवशीं हिंदू व मुसलमान या दोघांचे हातून एकत्रपणे सलोख्याने महाराजांना करवून घ्यावयाचे होते.

उरुसाची परवानगी मिळविली खरी परंतु तो पार पाडण्यांत अडचणीही तशाच होत्या. एकतर शिरडीगांव, नगर जिल्ह्याचा चैत्रांतील उन्हाळा, गावांत पाण्याचा दुष्काळ, दोन मुख्य विहिरी त्यापैकीं एकतर आटलच असे, व दुसरीचें पाणी खारे. याच खाऱ्या पाण्याचे विहीरीत महाराजांनीं एकदां फुलें टाकून तिचें पाणी गोड केले त्यावेळीं महाराजांनीं उद्गार काढले होते कीं शिरडींत पुढे पाणी पुष्कळ होईल व पाण्याचे पाट वाहतील. ही महाराजांची वाणी पुढे खरी जाहली. गोदावरीचा कालवा झाल्यापासून पाण्याचे पाट वाहूं लागले व ज्या विहिरींना ७५।१०० हात दोर लागत असे तेथें आतां १०।१२ हातावर पाणी मिळते. हें सर्व अलीकडे झालें परतु उरुसाचे सुरवातीचेवेळीं पाण्याचा दुष्काळ बराच जाणवत असे. उरुसांत मुख्य मेहेनत तात्या पाटलांचीच असे. त्यांनीं एका लांबच्या विहीरीला मोटा लावून पाण्याची सोय केली. उरुस किंवा जत्रा म्हणजे दुकानें पाहिजेत, येणाऱ्या लोकांचे करमणुकीकरितां तमाशे कुस्त्या वगैरे खेळ पाहिजेत. तीही व्यवस्था गांवोगांव मनुष्ये पाठवून मंडळीनी केली. मिरवणूक पाहिजे. त्याची ही व्यवस्था झाली. गोपाळराव गुंडाचे एक समदु:खी स्नेही दामुअण्णा कासार म्हणून नगरचे एक व्यापारी आहेत. यांनाही तीन कुटुंबें असून मुलगा नव्हता. महाराजांचे आशिर्वादानें दामुशेटला मुलगा झाला. गोपाळराव गुंडानीं दामुशेटला या दिवशीं महाराज असत असत त्या मशीदीवर निशाण चढविण्यास

सांगितले व दामुशेटनीं तें कबूल केलें. रा. शंकर रघुनाथ देशपांडे उर्फ नानासाहेब निमोणकर * हे महाराजांचे एक निस्सीम भक्त होते. निशाणाची कल्पना गोपाळराव गुंडानीं त्यांना सांगितली व नानासाहेबांना ती पसंत पडून त्यानीं जरीचे निशाण चढविण्याचे पत्करिले. याप्रमाणे हीं दोन निशाणे एक जरीचें नाना साहेब निमोणकरांचे व दुसरे साधे दामुशेटचें अशीं दोन निशाणे गावांतून मिरवीत आणून मशीदीवर दोहींकडे दोन चढवि-ण्याचा प्रघात पडला व तो अव्याहत अद्यापपर्यंत चालू आहे. नानासाहेब वारल्यानंतर त्यांचे चिरंजीवानीं निशाण पाठविण्याचे कायम ठेविलें. दामुशेट स्वतः येऊन निशाण चढवीत असतात. याशिवाय उरुसानिमित्य आणखी एक मिरवणूक सुरु झाली. ती ‘संदल’. अमीर शक्कर दलाल म्हणून कोऱ्हाळ्याचा एक मुसलमान महाराजाचा भक्त होता. ‘संदलीची कल्पना त्याची. त्यांनीं संदलीबद्दल महाराजांची परवानगी मिळविली व ‘संदल’ करण्याचे आपले अंगावर घेतले. ‘संदलम्हणजे मुसलमानी रिवाजाप्रमाणें उगाळलेले चंदन, चंदनाचा भुसा थाळ्यांत घालून तें थाळें पुढे ऊद जाळीत गावांतुन मिरवीत न्यावयाचें. व शेवटीं मिरवणूक मशीदीत आणून ताटांतील उगाळलेल्या चंदनाचे पंजे सर्व मशीदभर भिंतीवर हातानें उडवावयाचे. या करितां लागणारे सर्व साहित्य म्हणजे ताशे, बँडबाजा किटसनचे व ग्यासचे दिवे, दारूकाम हे सर्व अमीर शक्कर आपल्या खर्चानें आणीत असें. अमीर शक्कर तीन वर्षांपूर्वीं वारला व आतां ही संदल मिरविण्याचे काम त्याच्या बायकोनें सुरू केलें आहे. बहुतेक प्रसिद्ध पीरांचे ठिकाणीं ही संदल विशिष्ठित दिवशीं काढण्याचा रिवाज आहे. परंतु पीरांचे हयातींत (महाराजांना मुसलमान लोक ‘पीर’ म्हणत असत) संदल फार मोठ्या भाग्यवान पीराशिवाय निघत नहीं असें अमीर शक्कर मोठ्या अभिमानानें सांगत असे. याप्रमाणे एकाच दिवशीं हिंदूंची निशाणाची मिरवणूक व मुसलमानांची संदल अशा दोन मिरवणूकी निघण्याचा परिपाठ

* याचें चरित्र लवकरच श्रीसाईलीलेंत येईल.

पडला व दोन्हीं जातींत कांहीं तंटा फिसाद न होता या दोन्ही मिरवणुकी अद्याप चालू आहेत. दोन्हीं वेळीं हिंदु व मुसलमान एकदिलाने त्यात भाग घेतात. इतका सरंजाम जमल्यावर मग माणसांना काय तोटा. आजूबाजूच्या गांवचे शेकडों (पुढें हजारों झाले ) लोक येऊन उरूस साजरा करूं लागले.

प्रतिवर्षी उरुसाचा दिवस हा महाराजाचे भक्ताना फार महत्वाचा वाटे व ज्यांना सवड असेल ते बहुतेक उरुसाकरितां शिरडीस नेमानें येत असत. त्यात विशेषेकरून राधाकृष्ण आई कडील मंडळी तर हटकून यावयाची. उरुसाची बाह्य व्यवस्था जशी तात्या पाटील पहात असत तशी सर्व अंतर्व्यवस्था राधाकृष्ण आईकडे असे. या दिवसांत राधाकृष्ण आईची कोठी म्हणजे एखाद्या मोठ्या लग्नघराप्रमाणे किंवा यज्ञशाळेप्रमाणें गजबजलेली असे. उत्सवास लागणारीं उपकरणे त्याचेकडे तयार होत असत. कोणी लहान लहान निशाणें तयार करण्यात दंग, तर कोणी कागदाचीं फुलें कातरण्यांत दंग. कोणाकडे चांदीचें सिंहासन छत्र चामरे स्वच्छ करण्याचें काम तर कोणाकडे उरुसाप्रीत्यर्थ होणाऱ्या मोठ्या स्वयंपाकाचा शिधा साफसूफ करण्याचें काम. मिळून राधाकृष्ण आईकडे सर्व मंडळी कांहींनाकांहीं कामांत गुंतलेली असावयाची. त्यांना स्वतःला किंवा त्यांच्या मंडळींना या दोन तीन दिवसांत दिवसा किंवा रात्रीं बिलकुल विश्रांती मिळत नसे. अविश्रांत श्रम म्हणतात ते या मंडळींना शब्दशः होत असत. रामनवमीच्या पूर्वीची रात्र किंवा त्याच्या आधींची रात्र जी महाराजांची चावडींत निजण्याची असेल त्या रात्रीं महाराजांची मशीद राधाकृष्ण आई धुववून व रंगवून काढीत असत. महाराज चावडींत निजण्यास गेले कीं राधाकृष्ण आई आपल्या सर्व सेनेसह मशीदीच्या पुढें हजर होत असत. प्रथम मशीदींतील सर्व महाराजांचे सामान व्यवस्थेशीर खालीं काढावें लागत असे. धुनींतील अग्नी खालीं आणून जतन करावा लागत असे. हें झाल्यानंतर मशीद धुण्याचें काम सुरू होई. मशीदींत सतत धुनी राहत असल्यामुळें सर्व भिंती व लांकुडकाम साहजिकच धुरकटून जात असें. हा धुरकटपणा काथ्याच्या गड्यांनीं व साबणाचे

पाण्यानें घासून घासून काढावा लागत असे. १०।१५ मंडळी हें काम करीत असत तर दुसरी तितकीच मंडळी २००।३०० हाताच्या अंतरावर असलेल्या विहीरीच्या घागरीच्या घागरी आणून पाण्याचा पुरवठा करीत असे. ही काम करणारी सर्व मंडळी उत्साहाकरितां आलेली वरिष्ठ वर्गातील असत व त्यांत कित्येक मोठाले हुद्देदार माणसेही असत. महाराजाची सेवा आपण करीत आहोंत ह्या उच्च भावनेंत खरोखर हातानें होत असलेले मजूर वर्गाचे काम आपण करीत आहोंत ही कल्पनाही मनांत येत नसे.

याप्रमाणे मशीद धुवून झाल्यानंतर ती सर्व पुसून काढावी लागत असे कारण लगेच तिला रंगवावयाची असे. नंतर रंग दिला जात असे. हें सर्व काम झाल्यावर पुन्हां महाराजांचे सर्व सामान जसेच्या तसे जेथल्या तेथें ठेवून, ठिकाणीं धुनी प्रज्वलीत करून मंडळी आपलें काम संपवीत असत. इतके सर्व होईपर्यंत पहाटेचे ४ वाजत असत. दुसरे दिवशीं सकाळीं, एका रात्रींत जशी काहीं यक्षिणीची कांडी फिरून एकदम सर्व बदलावें तसे मशीदीचें बाह्य स्वरूप दिसत असे. हें सर्व काम महाराज रात्रीं मशीदींत नसतील तेव्हांच होत असे. परंतु एक वर्षीं मात्र त्यांत खंड पडला. रामनवमीचे आधीचे रात्रीं महाराजांची मशीदींत वस्तीची पाळी होती. पूर्वरात्रीं मशीद कांहीं अपरिहार्य कारणामुळें धुतली गेली नाहीं. उत्सवाला शिरस्त्याप्रमाणें मशीद धुतली जावी ही सर्व भक्त मंडळींची उत्कट इच्छा, रात्र मिळण्यासारखी नाहीं. तेव्हां दिवसा काम करण्याची महाराजांची परवानगी मागावी असे ठरलें. त्याप्रमाणे परवानगी विचारतां ना हो करीत महाराजानीं परवानगी दिली. व महाराज स्वतः खालीं मंडपांत येऊन बसले. मग मंडळींच्या हुरुपाला काय विचारतां? कधीं न कामाला लागणारी मंडळीसुद्धां या प्रेमाच्या मजूर वर्गांत सामील झाली व धुण्याचें, रंगविण्याचें काम संध्याकाळापूर्वीं पूर्ण झाले. महाराजही मधून मधून मंडळींची थट्टा करून प्रोत्साहन देत होते. जरी महाराजानीं परवानगी दिली होती तरी महाराज केव्हां नारसिंह अवतार धरतील व सर्वांना हुसकून लावतील ही भिती कांहींच्या पोटांत प्रथम होतीच. परंतु त्यांच्याचकडून मिळत गेलेल्या प्रोत्साहनानें ती फोल ठरली.

रामनवमीच्या पूर्व रात्रीं मशीदींत हे काम चालत असे, तर तिकडे राधाकृष्ण आईच्या घरात दुसरेही काम चालू असे महाराजाना अन्नदान फार प्रिय असे. म्हणून एखाद्या समाराधनेप्रमाणे राधाकृष्ण आईच्या घरात मोठा स्वयंपाक होत असे. स्वयंपाकी मंडळी भाडेकरी नसून महाराजांचे भक्त बहुव बनत असत. कोणी मालगुजार अखंड नामस्मरण करीत एकीकडे ५।१० पायलीच्या बुंदी रात्रभर पाडीत असे. तर दुसरीकडे एखादा वकील मोठ्या कढईभर शिरा बनवीत असे. तिसरीकडे दोन तीन मंडळी ४।५ तपेलीं साखरभाताचीं उतरीत असत. एके ठिकाणीं ५।७ मंडळी ( बायका व पुरुष ) बुंदीचे लाडू वळीत असत. याशिवाय सकाळीं भात भाजी पोळ्या वरण ह्या जिनसा मोठ्या प्रमाणावर होत असत. निराळ्या उत्सवाचे दिवशीं दोन प्रहरीं मशीदीपुढें माडवांत फकीर व इतर गरीब माणसाच्या पंक्ती महाराजांसमोर उठत असत व हें सर्व अन्न त्याना वाढले जात असे. १९१२ सालपर्यंत उरूसाचे स्वरूप हलके हलके वाढत इतके व्यापक झाले.

१९१२ सालीं उरूसाचें स्वरूप पालटून त्यांतून रामजयंतीचा उत्सव सुरू झाला. यावेळीं शिरडीस दादासाहेब खापर्डे सहकुटुंब बरेच महिने राहिले होते. त्यांचेबरोबर एक ह. भ. प. कृष्णराव जोगेश्वर भीष्म ( श्रीसाईनाथ सगुणोपासनेचे कर्ते ) नांवाचे गृहस्थ होते. त्यांची बैठक दीक्षितांचे वाड्यात पुढच्या पडवींत असे. या सालीं शिरस्त्या प्रमाणें महाराजांचे एक भक्त लक्ष्मणराव ( भीष्म हे यांना याच नांवाने हाका मारीत असत म्हणून आम्ही त्याच नांवाने त्यांचा उल्लेख केला आहे) उरुसाकरितां आदले दिवशीं सकाळीं आले व नेहमीं प्रमाणे दीक्षिताच्या माडीवर उतरले. वेळेवर पूजासाहित्य घेऊन मशीदींत जाण्याकरितां ते खालीं आले. भीष्मबोवा पडवींत बसलेच होते. त्यांनीं लक्ष्मणरावाला हांक मारली व म्हणूं लागले कीं, आपल्या मनात एक सुंदर कल्पना आली आहे व जर तुम्हीं मदत कराल तर ती पार पडेल. लक्ष्मणरावांनीं होकार भरल्यावर ते

सागू लागले कीं, हा शिरडीतील उरूस रामनवमीलाच भरतो तेव्हा यात काही तरी परमेश्वरी योजना आहे. रामजयंतीचा उत्सव हा हिंदूना फार प्रिय व येथे उरूसही रामनवमीलाच असतो तेव्हा आपण या संधीचा फायदा घेऊन रामजन्म सुरू करावा. लक्ष्मणरावाना ती कल्पना पटली व महाराजाची आज्ञा मागावी व ती मिळाल्यास रामजन्म अवश्य करावा असे त्यानीं सांगितले. मात्र एक प्रश्न असा पडला कीं, जन्मोत्सवाला कीर्तन अवश्य आहे. या खेडेगावांत किंवा आसपास इतक्या थोडया अवधींत कीर्तनकार हरिदास मिळणार नाहीं. परंतु भीष्माना सदीच्छेनेच ही स्फूर्ति झालेली तेव्हां यामुळे थोडेच अडणार त्यानीं लगेच सांगितलें कीं,आपले रामजन्माचे आख्यान तयार आहे.आपण कीर्तन करूं व तुम्ही पेटी वाजवा.भजनी मेळ्याचा पखवाज वाजविणारा होताच. याप्रमाणेच सर्व तयारी झाली व महाराजाची परवानगी घेण्याचे ठरले. सुंठवडा राधाकृष्णआईकडून तयार करवून घेण्याचे ठरलें. अशा कामात राधाकृष्ण आईचे पूर्ण पाठबळ मिळेल ही लक्ष्मणरावांची खात्री होती. लगेच लक्ष्मणराव व भीष्मबोवा महाराजांची परवानगी विचारण्या करिता मशीदींत गेले. लक्ष्मणरावाचा स्वानुभवावरून असा दृढ विश्वास असे कीं, महाराज सर्वव्यापी आहेत व आपण कोठें काय करतों हें त्यांना सर्व कळत. त्यामुळे आपण शिरडीहून गेल्यापासून पुन्हा शिरडीस येईपर्यंतच्या काळांत आपल्या हातून घडलेल्या सत्कृत्याबद्दल महाराजांकडून उत्तेजन व दुसऱ्या बद्दल निषेधपर कांहींतरी उद्गार प्रथम भेटींत निघणार अशी खात्री असे. म्हणून नेहमींच प्रथम भेटींत कांहीं काळ त्यांची चित्तवृत्ति बावरलेली राहत असे. लक्ष्मणराव महाराजांचे पायापाशीं जाऊन बसले व भीष्मबोवा त्यांचे मागें बसले. दर्शन घेतल्यावर महाराजांनीं लक्ष्मणरावला विचारलें " वाडयांत काय चालले होतें. परंतु लक्ष्मणराव बावरलेले असल्यामुळे त्यांना उत्तर सुचेना. ते आल्यापासून वाडयात पुष्कळ गोष्टी झाल्या होत्या. महाराजांनीं लगेच भीष्मबोवांना विचारलें " कां बुवा काय म्हणणें आहे ?" त्यांबरोबर लक्ष्मणरावाला महाराजांच्या प्रश्नाचा रोख समजला व

त्यांनी रामजन्माच्या उत्सवासंबंधी झालेला विचार सांगून महाराजांची परवानगी मागितली; महाराजांनी परवानगी दिली. त्यामुळें सर्वांना फार आनंद झाला. लक्ष्मणरावांनी ती हकीकत राधाकृष्ण आईस सांगितली. त्यांनाही फार आनंद झाला. आधींच त्या बाई उत्सवप्रिय त्यांत उरुसाच्या उत्सवात राधाजन्माचा उत्सव मग त्यांच्या आनंदाला काय विचारता? त्यांच्या दैवताचा पाळणा होता तो द्यावयाचा त्यांनी कबूल केला. याप्रमाणे सर्व जुळवाजुळव पूर्ण झाली.

रामजन्माचा दिवस उजाडला. मंडप सुशोभित करण्याचे काम सुरू झाले. केळीचे खुंट, पताका, तोरणे लागलीं. महाराज लेंडीवर गेले तेव्हा त्यांच्या बैठकीच्या जागेसमोरच पाळणा बांधला. महाराज मशीदींत परत आले. नित्यनियमाप्रमाणें भक्त मंडळींच्या पूजा सुरू झाल्या. आधींच उरुसाची गर्दी त्यांत प्रथमच रामजन्म होणार म्हणून सभामंडपांत फार दाटी झाली. महापूजा व आरती रामजन्मानंतर करावयाचें निश्चित झाले. ११ वाजता भीष्मबोवा महाराजांसमोर कीर्तनाला उभे राहिले. लक्ष्मणराव महाराजांचें दर्शन करून बाजाची पेटी वाजविण्यास बसले. कीर्तन सुरू होणार तो महाराजांनीं मनुष्य पाठवून लक्ष्मणरावाला वर मशीदींत बोलाविलें. पांच मिनीटापूर्वींच दर्शन घेऊन आलों व लगेंच पुन्हां बोलाविलें म्हणून लक्ष्मणरावांचे पोटांत धस्स झालें. जन्मोत्सवाला अडचण येते कीं काय अशी सर्वांना भिती वाटली. बोलावण्याप्रमाणें ते महाराजा जवळ गेले. महाराजांनीं विचारिलें हे काय चाललें आहे व पाळणा कशाला बांधला? रामजन्माकरितां पाळणा बांधला व आतां कीर्तन सुरू होत आहे असें लक्ष्मणरावांनीं सांगितलें. महाराजांनीं निंबोरावरून एक हार घेतला (भक्तांनीं गळ्यांत घातलेले हार काढून महाराज निंबोरावर ठेवीत असत) व तो लक्ष्मणरावांच्या गळ्यांत घातला व दुसरा हार त्यांचे जवळ देऊन बुवांचे गळ्यांत घालण्यास सांगितला. कीर्तन सुरू होऊन रामजन्म होईपर्यंत सर्व निर्विघ्न पार पडलें. राजा रामचंद्राच्या नांवाचा जयजयकार करून मंडळींनीं गुलाल

उधळला. सर्व वातावरण गुलाबी झालें. भालदार चोपदार ललकारूं लागले. ताशे, वाजंत्री, बेंडवाजा वगैरे वाद्यें वाजूं लागलीं. सर्व आनंदी आनंद झाला.

सभामंडपात अशा तऱ्हेचा गजर चालू असतां तेवढ्या गोंगाटांत महाराजांचा सिंव्हनाद ऐकूं आला. मशिदींतील मंडळी भराभर खालीं उतरूं लागली व मशीद मोकळी झाली. लगेच महाराज 'नरसिंव्ह रूप' धरून मशिदीच्या पायऱ्यांजवळ खांबाशीं येऊन उभे राहिलेले दिसले व मोठमोठ्यानें शिव्या देऊं लागले. कारण काय झालें तर एका अधिकप्रसंगी भक्तानें महाराजांच्या अंगावर गुलाल टाकला व तो त्यांच्या डोळ्यांत गेला. महाराजांचे ते रूप पाहून महाराजांच्या लीला माहीत नसलेली सर्व मंडळी सभामंडप सोडून बाहेर पळाली. सर्व गोंगाट बंद होऊन नुसत्या महाराजांच्या शिव्या ऐकूं येऊं लागल्या. निर्ढावलेल्या भक्तमंडळींना हा प्रकार नवा नव्हता, श्रीरामचंद्र जन्मास आले तेव्हां अहंरावणाचा व दुर्वृत्ति राक्षसाचा नाश करण्याकरितां महाराजांनीं आपले सौम्य स्वरूप बदलणें हें साहजिकच होतें. शिवाय हा नेहमीचाच अनुभव होता कीं शिरडीस कांहीं नवा उपक्रम सुरू केला म्हणजे महाराजांनीं सुरवातीला नरसिंव्हरूप घ्यावयाचें, जवळ सांपडलेल्या एखादे दुसऱ्या भक्ताला प्रसाद द्यावयाचा व सर्वांना शिव्या द्यावयाच्या. प्रतिकूल ग्रहांची शांती करण्याचा महाराजांचा हा एक मार्ग होता असें मानलें जात असे, व शिव्या शुभ आशिर्वाद म्हणून गणल्या जात असत. याप्रमाणें महाराजांनीं शांती केली व पूर्ण आशिर्वाद देऊन हा नवीन सुरू झालेला राम जयन्तीचा उत्सव चिरायु केला. अशावेळीं महाराज मशिदींतील भांडी, घडे वगैरे भिरकावून देत असत. एकादं दुसरी हंडी फोडीत असत. या सपाट्यांत आपल्या पाळण्यावर गदा येते कीं काय अशी राधाकृष्ण आईला धास्ती पडली व पाळणा सोडून आणण्याचा त्यांनीं लक्ष्मणरावाच्या मागें लकडा लावला. पण पाळणा सोडायचा कसा ? महाराज नरसिंव्ह अवतार घेऊन तेथेंच जवळ उभे. शेवटीं लक्ष्मणराव हिम्मत करून महाराजांची नजर चुकवून पाळण्या जवळ तर गेले, त्यांनां वाटलें कीं आपण महाराजांची नजर चुकविली, परंतु सर्वव्यापी, सर्वकाळ सर्व बाजूला